Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's

# Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous),

Near Central Bus Stand, Chandra Nagar, Latur - 413512 (Maharashtra)
Affiliated To Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
Arts, Commerce, Science, Comp.Sci. & I.T., Biotechnology and B.Voc.
NAAC Accredited B⁺⁺ Grade (3rd Cycle) with CGPA 2.99

| Dr. Gopalrao Patil | Anirudh Jadhav | Dr. Mahadev Gavhane |
|---|---|---|
| President | Secretary | Principal |


## सामंजस्य करार (Memorandum of Understanding)

शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर संचालित

**राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर**

आणि

**गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगांव**

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर हे महाराष्ट्रातील एक नामांकित व शैक्षणिक नेतृत्व करणारे महाविद्यालय आहे. 'उत्कृष्टतेचा ध्यास' हे 'मिशन' म्हणून प्रारंभापासूनच संस्था व महाविद्यालयाने स्वीकारले आहे. संस्थाचालकांचा ध्येयवाद, शैक्षणिकदृष्टी आणि प्रयत्नातील प्रामाणिकपणा याबरोबरच शिक्षक-प्राध्यापकांची समर्पित वृत्ती या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून महाविद्यालयाचा लौकिक वाढत गेलेला आहे. विद्यार्थ्यांची कठोर मेहनत घेण्याची तयारी आणि जागरूक पालकांचा खंबीर पाठिंबाही यास कारणीभूत आहे. सातत्याने मेहनत घेत राहणे, वर्षानुवर्ष ते टिकवून ठेवणे, सातत्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे आणि पाल्य-पालकांत विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचे कार्य या महाविद्यालयाने केले आहे.

महाविद्यालयाने निर्माण केलेला 'शाहू पॅटर्न' पुढे 'लातूर पॅटर्न' म्हणून प्रसिद्ध झाला. महाराष्ट्रातील आदर्श शिक्षण संस्थांना जेव्हा शासनाच्या वतीने पुरस्कार देण्याचे घोषित केले, तेव्हा पहिला पुरस्कार अर्थात शिव छत्रपती शिक्षण संस्थेला मिळाला. स्वा. रा. ती. म. विद्यापीठाकडून 'उत्कृष्ट' महाविद्यालयाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. राजर्षी शाहू महाविद्यालयात अकरावी-बारावी विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातून विद्यार्थी येतात. महाविद्यालयात शिक्षण घेऊन जगभरातल्या देशात विद्यार्थी पोहोचलेले आहेत. विशेषतः अमेरिकासारख्या विकसित देशात या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान-तंत्रज्ञानात फार मोठी झेप घेतलेली आहे.

सद्या कला, विज्ञान, वाणिज्य, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, व्होकेशनल आदी विभागातून सुमारे ४५०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. स्पर्धा परीक्षा विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासात भर पडत असून प्रशासकीय सेवेतील अधिकारी घडवण्याचे काम सुरू आहे. CA फाऊंडेशन वर्ग, IIT- JAM च्या वर्गातून विद्यार्थी घवघवीत यश मिळवत IIT मध्ये प्रवेशित होत आहेत.

महाविद्यालयातील मराठी विभागामार्फत वर्षभर विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. विविध विषयावर चर्चासत्रे, लेखन कार्यशाळा, व्याख्याने, वाङ्मय मंडळे, वाचन संस्कृती चळवळ, ई-वाचन कट्टा आदी सारखे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. मागील दोन वर्षापासून महात्मा गांधींच्या विचाराने प्रेरित होऊन आपल्या मार्फत घेण्यात येणाऱ्या 'गांधी विचार संस्कार परीक्षे'त महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उल्लेखनीय असे यश संपादित केले आहे. २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

**गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगांव**

गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव ही संस्था गांधी विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी स्थापन झालेली आहे, हे आपण जाणताच आहात. विद्यार्थ्यांवर खऱ्या अर्थाने माणूसकीचे, गांधी विचारांचे संस्कार होण्यासाठी गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संस्थापक श्रद्धेय पद्मश्री भवरलालजी जैन (मोठे भाऊ) यांच्या विचार मंथनातून संस्थेची मुहूर्तमेढ झालेली आहे. श्रद्धेय मोठे भाऊंच्या या विचारांनी प्रेरित त्यांची पुढची पिढीसुद्धा या कामात हिरिरीने सहभाग घेऊन आपले मार्गदर्शन व योगदान गांधी रिसर्च फाऊंडेशनला देत आहे. आज हे फाऊंडेशन गांधी विचारांचे व संशोधनाचे मोठे केंद्र झाले आहे. गेल्या पंधरा-सोळा वर्षात देशांतर्गत व देशाबाहेरील 20 लाखांच्यावर विद्यार्थ्यांनी व कैद्यांनी गांधी विचार संस्कार परीक्षेच्या माध्यमातून गांधी विचाराशी जोडले आहेत, संस्कारित झाले आहेत, होत आहेत.



E-mail : principal@shahucollegelatur.org.in, Website : www.shahucollegelatur.org.in, Ph. : (02382) 245933, 245380 Fax : (02382) 253645 Jr. Sci. College : (02382) 253656

Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's
# Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous),
Near Central Bus Stand, Chandra Nagar, Latur - 413512 (Maharashtra)
Affiliated To Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
Arts, Commerce, Science, Comp.Sci. & I.T., Biotechnology and B.Voc.
NAAC Accredited B++ Grade (3rd Cycle) with CGPA 2.99

Dr. Gopalrao Patil
President

Anirudh Jadhav
Secretary

Dr. Mahadev Gavhane
Principal

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर आणि गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगांव या संस्था एकमेकांबरोबर 'सामंजस्य करार' (MoU) दिनांक ०२/०७/२०२१ रोजी करत आहोत.

**कराराची उद्दिष्टे खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत:**

१. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.
2. दोन्ही संस्था मिळून काही परिसंवाद व्याख्याने/ कार्यशाळा/ शिबीर आयोजित करणे.
3. 'गांधी तीर्थ' या ठिकाणी राज्य, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील वक्त्यांचे मार्गदर्शनपर कार्यक्रम असल्यास विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळवून देणे.
४. महात्मा गांधी यांच्या विचारांवर आयोजित परीक्षेत विद्यार्थ्यांना सहभागी करणे.
५. गांधी तीर्थ, जळगाव येथे विद्यार्थ्यांची 'अभ्यास सहल' आयोजित करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे:**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक प्रशिक्षणात सहकार्य करणे.
२. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार दोन्ही संस्थाकडून एक निश्चित योजना सादर करणे.

**अटी:**

१. परस्पर सामंजस्य कराराचे नूतनीकरण अथवा समाप्ती एकमेकास पूर्व सूचना देऊन केली जाऊ शकते.
२. दोघांपैकी कोणत्याही संस्थेस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.
३. परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ अशी पाच (०५) वर्ष असून त्यानंतर हा करार संपुष्टात येईल.
४. परस्पर संमतीने पुढील तीन अथवा पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
५. नूतनीकरणासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल

**समन्वय:**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणी याबाबत राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव यांची राहील. **महाविद्यालयाचे प्राचार्य व मराठी विभागाचे प्रमुख काम पाहतील.**
२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेत व कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येईल.
३. खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार (MoU) हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे.

**तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.**

| अ. क्र. | नाव | संपर्क | मेल आयडी |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य,<br>राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर | ०२३८२२४५९३३ | principal@shahucollegelatur.org.in |
| २. | गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगांव | ९४०४९५५२२० | info@gandhifoundation.net |
| | | | |

दिनांक: ०२/०७/२०२१

Gandhi Research Foundation

Shahu Mahavidyalaya, Latur (Autonomous)

गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय,
लातूर

पत्र क्र. END